# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र गट-क (पूर्व) परीक्षा 2018 (जाहिरात क्र. 23/2018)

## "कर सहायक, गट-क" पदासाठीचा निकाल

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 10 जून, 2018 रोजी **"महाराष्ट्र गट-क (पूर्व) परीक्षा 2018"** घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेमधून **"कर सहायक, गट-क"** पदासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून **कर सहायक (मुख्य) परीक्षेसाठी** पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दि. 18 ऑगस्ट, 2018 रोजी जाहीर करण्यात आला आहे. कर सहायक पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

2. उपरोक्त निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांनी त्यांच्या आवेदनपत्रात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. प्रस्तुत परीक्षेत पात्र ठरलेले जे उमेदवार मुख्य परीक्षेसाठी विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतील व विहित परीक्षा शुल्क भरतील अशाच उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येईल. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

3. **मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्र. 1 दि. 14 ऑक्टोबर, 2018 रोजी घेण्यात येईल.**

4. प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दि. 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार विषयांकित गट-क पदासाठी विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांकडून विहित दिनांकास क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी केलेली असणे अनिवार्य राहील.

5. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 18 ऑगस्ट, 2018

उपसचिव (परीक्षा-2)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग